नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :-१७/६/२०२६

**-: परिपत्र :-**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र. १ (के) अन्वये बुधवार दिनांक १७ जून २०२६ रोजी दुपारी ३:०० ( तीन ) वाजता भरलेल्या माहे जून २०२६ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्र.१/६७**

संदर्भ - १) मा.सुहास टिंगरे यांचे दि.१६/४/२०२६ रोजीचे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३,दि.१६/४/२०२६
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४४,दि.२९/५/२०२६ चा अभिप्राय विचारासाठी.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३५,दि.१२/६/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

विश्रांतवाडी चौक ते फुलेनगर रोड या मार्गावरील बीआरटी मार्गिका काढणेबाबत पीएमपीएमएल कार्यालयाचा अभिप्राय पुढीलप्रमाणे -

सद्यस्थितीमध्ये संगमवाडी ते विश्रांतवाडी या बीआरटी मार्गावर परिवहन महामंडळामार्फत१२६ बसेसच्या दैनंदिन १२०६ खेपांसह प्रतिदिन सरासरी ८०,००० प्रवाशांना जलद, सक्षम, किफायतशीर व सुरक्षित सेवा पुरविली जात आहे. सद्यस्थितीमध्ये बीआरटी कॉरीडॉरची दुरूस्ती देखील मनपामार्फत करण्यात येत असून परिवहन महामंडळ मार्फत फक्त बसेसचे संचलन करण्यात येते. तथापि सदर बीआरटी मार्ग काढल्यास वाहतूक कोंडीमुळे खेपा रद्द प्रमाणात वाढ, वाहनांचा वेग मंदावणे, अपघाताचे प्रमाण वाढणे इ.समस्या उद्भवण्याची शक्यता विचारात घेता संगमवाडी ते विश्रांतवाडी बीआरटी कॉरीडॉरवरील बॉम्बे सॅपर्स ते विश्रांतवाडी दरम्यान असलेली बीआरटी मार्गिका काढणे प्रवाशांच्या दृष्टीकोनातून योग्य होणार नाही असा पीएमपीएमएल कार्यालयाचा अभिप्राय प्राप्त झालेला आहे.

विश्रांतवाडी चौक ते फुलेनगर रोड या मार्गावरील बीआरटी मार्गिका काढणेबाबत येरवडा वाहतूक विभाग कार्यालयाचा अभिप्राय पुढीलप्रमाणे -

येरवडा वाहतूक विभाग कार्यक्षेत्रातील शादलबाबा चौक ते चंद्रमा चौक ( डेक्कन कॉलेज रोड ) व चंद्रमा चौक ते विश्रांतवाडी चौक ( आळंदी रोड ) या मार्गावरील १) वाहतूक कोंडी सोडविणे २) प्राणांतिक व गंभीर अपघात टाळणे ३) रोडची रूंदी वाढवून वाहनांसाठी जास्तीत जास्त रोड उपलब्ध करून देणे यासाठी बीआरटी मार्गिका काढून घेणेची कार्यवाही आपले विभागामार्फत करणेत यावी.

उपरोक्त पार्श्वभूमीवर विश्रांतवाडी चौक ते फुलेनगर रोड या मार्गावरील बीआरटी मार्गिका काढणेबाबत पथ विभागाचा अभिप्राय पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

विश्रांतवाडी चौक ते फुलेनगर रोड दरम्यान विश्रांतवाडी चौक येथे भुयारी मार्ग व उड्डाणपुलाचे काम प्रकल्प विभाग यांचेमार्फत चालू आहे. सदर काम पूर्ण झालेनंतर बीआरटी मार्गिकेची उपयोजितता कमी होणार आहे. साठे बिस्किट बस थांबा येथे बीआरटी मार्गिका खंडीत झालेली असून येरवडा मनोरूग्णालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, बॉम्बे सॅपर्स चौक आदी ठिकाणी दुसऱ्या बाजूस बीआरटी मार्गिका ओलांडून वाहनांची ये- जा होते. त्यामुळे सदर ठिकाणी अपघात प्रवण झालेले आहे. बीआरटी मार्गावर पीएमपीएमएल बस सेवेची वारंवारिता मागणीच्या प्रमाणात नाही. त्यामुळे अन्य वाहनांची सर्वसाधारण वाहतूक बीआरटी मार्गिकेमधून होत आहे. बीआरटी मार्गिकेमधून विरूध्द दिशेने दुचाकी वाहक येतात व अपघात होतात.

बिंदूमाधव ठाकरे चौक येथे भुयारी मार्ग व उड्डाणपुलाचे काम प्रकल्प विभाग यांचेमार्फत चालू आहे. सदर कामाचा विस्तार चौकातील संगमवाडी रस्ता, आंबेडकर चौक रस्ता, येरवडा ( पर्णकुटी ) रस्ता व डेक्कन कॉलेज रस्ता या चारही रस्त्यावर सुमारे १०० ते १५० मी.लांबीपर्यंत राहणार असल्याने उर्वरित बीआरटी मार्गिकेची उपयोजितता लक्षणीयरित्या घटणार आहे.

पुणे आळंदी मार्गावर बिंदूमाधव ठाकरे चौक ते साठे बिस्कीट दरम्यान वाहतूक कोंडी निर्माण होत असून, नागरिकांना मोठ्या प्रमाणात वेळेचा अपव्यय सहन करावा लागत आहे. ही वस्तूस्थिती आहे. अर्थात पुणे आळंदी रस्ता येथील बीआरटी मार्गिका काढून टाकलेनंतर बस सेवेसह इतर वाहनांकरिता अतिरिक्त २ लेन वाहतूकीस खुल्या झाल्यास नागरिकांच्या सोयीचे होणार आहे.

अशा आशयाचा मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय स्विकृत करून मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

**विषय क्र.२/६८**

संदर्भ – १) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त ( वि ) यांची दि.१३/११/२०२५ रोजी पथ विभागाकडील रस्ते भूसंपादन करणेबाबत झालेली बैठक

२) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडील जा.क्र.४८१६,दि.१६/१२/२०२३ चे पत्र.

३) मुख्य अभियंता ( पथ ) कार्यालयाकडील जा.क्र.पथ/११२२७,दि.१८/१२/२०२५ रोजीचे पत्र.

४) भूसंपादन व व्यवस्थापन विभाग यांचेकडील जा.क्र.LAM/५०७,दि.२६/५/२०२६

५) भूसंपादन व व्यवस्थापन विभाग यांचेकडील जा.क्र.LAM/२५७५,दि.२८/१/२०२६

६) सन २०२६– २०२७ मधील अंदाजपत्रकीय तरतूद.

७) मा.महा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/पथ/१६८,दि.९/६/२०२६ रोजीचे पत्र.

८) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५७,दि.१२/६/२०२६

-----

मा.महा.आयुक्त यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे पेठ वारजे स.नं.१०४ येथील १२ मी.सर्व्हिस रस्त्यामध्ये ताब्यात न आलेल्या उर्वरित जागा ताब्यात घेणेकामी भूसंपादन कार्यवाही सुरू करणे व त्यासाठी आवश्यक रक्कम पथ विभागाकडून उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.३/६९**

संदर्भ – १) मा.संदिप बाळासाहेब बेलदरे व मा.डॉ.दादा कोद्रे यांचे दि.११/६/२०२६ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२७३,दि.१६/६/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.३८ येथील दत्तनगर – टेल्को कॉलनी मधील ॲमिनीटी स्पेस सर्वे नंबर ५ मध्ये (MH19) हॉस्पीटलसाठी अंदाजे आरक्षित ( १.५ एकर ) जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. सदर जागेवर, बाणेर येथे ppp तत्वावर विकसित केलेल्या हॉस्पीटलच्या धर्तीवर आंबेगाव बुद्रुक येथील जागेवर सुसज्ज हॉस्पीटल विकसित करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.४/७०**

संदर्भ – १) मा.निलेश कोंढाळकर व मा.अल्पना गणेश वरपे यांचे दि.१८/५/२०२६ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२८४,दि.१६/६/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

श्री स्वामी समर्थ एज्युकेशन फाऊंडेशन ही संस्था गेली १६ वर्षे शैक्षणिक संस्था म्हणून पुणे भागात कार्यरत आहे. तसेच ही संस्था सामाजिक क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात काम करत आहे. पण सध्याची परिस्थिती पाहता मुले आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहत आहे आणि या घटकांचा विचार करून ही संस्था या मुलांकरिता रात्र शाळा / कॉलेजसाठी आपणाकडे बावधन भागातील स्वामी विवेकानंद ई–लर्निंग स्कूल , बावधन ही पुणे महानगरपालिकेची शाळा आपणाकडे ६ वर्ग खोल्या ८५ विद्यार्थ्यांसाठी ३० वर्षे भाडेतत्वावर मिळण्याकरिता विनंतीपूर्वक मागणी करत आहे. तरी श्री स्वामी समर्थ एज्युकेशन फाऊंडेशन या संस्थेला स्वामी विवेकानंद ई लर्निंग स्कूल बावधन ही शाळा रात्र शाळा व कॉलेज साठी भाडे तत्वावर चालवण्यासाठी मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.५/७१**

संदर्भ – १) मा.अमोल बालवडकर व मा.सुहास टिंगरे यांचे दि.२७/५/२०२६ चे पत्र.

२) मा.अमोल बालवडकर, मा.सुहास टिंगरे व मा.प्राची आल्हाट यांची दि.१६/६/२०२६ ची उपसूचना.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२८६,दि.१६/६/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व संदर्भ क्र.२ च्या उपसूचनेनुसार –

पुणे शहरामध्ये निर्माण झालेली कार पार्किंग समस्या पाहता शहरामध्ये विविध ठिकाणी आधुनिक मल्टी लेवल कार पार्किंग स्थळाची गरज आहे. ही काळाजी गरज असून, छत्रपती संभाजी महाराज उदयान, जंगली महाराज रस्ता येथील जुने व वापरासाठी अयोग्य असलेले मल्टीलेवल पार्किंग स्थळ पाडण्याचा प्रशासन नियोजन करत आहे. तरी सदर जागेवर पुन्हा नव्याने आधुनिक Multi Level Car Parking स्थळ संदर्भ क्र.२ च्या उपसूचनेनुसार बी.ओ.टी.धोरणानुसार उभारणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.६/७२**

संदर्भ – १) भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समिती जा.क्र.मआ/माव्य/४५५५,दि.१७/१०/२०२५ चे इतिवृत्त.

२) महाराष्ट्र महानगरपालिका ( स्थावर मालमत्तेचे भाडेपट्टयाद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्टयाचे नूतनीकरण ) नियम २०२३

३) जाहिरात क्र.१/१३०२,दि.२२/११/२०२५ रोजीची वर्तमानपत्रामधील जाहिरात.

४) मा.महा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/समाजविकास/१८५,दि.१६/६/२०२६ चे पत्र.

५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२९८,दि.१६/६/२०२६

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.२९ मधील पुणे मनपाच्या शाळा क्र.६५ मुलींची आंबील ओढा कॉलनी साने गुरूजी नगर येथील शाळेच्या प्रवेशद्वारा शेजारील अभ्यासिका येथे अशासकीय/सामाजिक/स्वयंसेवी संस्था यांना भाडेतत्वावर उपलब्ध करून देणेच्या खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**१)** प्रभाग क्र.२९ मधील पुणे मनपाच्या शाळा क्र.६५ मुलींची आंबील ओढा कॉलनी साने गुरूजी नगर येथील शाळेच्या प्रवेशद्वारा शेजारील अभ्यासिका ( क्षेत्रफळ ४०.४७ चौ.मी.) ही वास्तू समाज विकास विभागामार्फत द हिंदू फाउंडेशन, ५/२०७,साने गुरूजी नगर, सदाशिव पेठ, पुणे– ४११०३० या १० वर्ष कालावधीकरीता भाडेतत्वावर देणेस. त्याअनुषंगे द हिंदू फाउंडेशन, ५/२०७,साने गुरूजी नगर, सदाशिव पेठ, पुणे–४११०३० या संस्थेसमवेत करारनामा करणेस.

**२)** पुणे महानगरपालिकेने सदर जागेपोटी निश्चित केलेले मासिक भाडे र.रू.३७७२/– दरमहा भरून घेणेस व तीन महिनेच्या भाडे रक्कमे इतकी रक्कम अनामत म्हणून घेणेस. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका नियम २०२३ चे अनुषंगाने भाडे पट्ट्याच्या रक्कमेत दर तीन वर्षांनी सुधारणा करून वर्तमान वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम पाच टक्क्यांनी वाढविणेस व त्या प्रमाणात सुरक्षा अनामत रक्कमेत वाढ करणेस.

**३)** द हिंदू फाउंडेशन, ५/२०७,साने गुरूजी नगर, सदाशिव पेठ, पुणे–४११०३० या संस्थेमार्फत मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केलेल्या वास्तूचे संपुर्ण व्यवस्थापन, दुरूस्ती विषयक कामे करणेस.

**४)** समाज विकास विभागास आवश्यकता असल्यास सदर वास्तू वापरण्यास देणेस.

**५)** प्रकल्पासाठी आवश्यक असलेले फर्निचर व्यवस्था, तदनुषंगिक साधन–सामुग्री,प्रशिक्षित मनुष्यबळ इत्यादी बाबी द हिंदू फाउंडेशन, ५/२०७,साने गुरूजी नगर, सदाशिव पेठ, पुणे–४११०३० या संस्थेमार्फत पुरविणेस.

**६)** सदर ठिकाणी प्रकाश व्यवस्था, पाण्याची व्यवस्था करणे, सदर मिळकतीची किरकोळ देखभाल दुरूस्ती करणे तसेच विविध सोयी व कोणत्याही प्रकारची देयक जसे की विज देयक अथवा इतर तत्सम देयक द हिंदू फाउंडेशन, ५/२०७,साने गुरूजी नगर, सदाशिव पेठ, पुणे–४११०३० या संस्थेकडून करणेस.

**७)** द हिंदू फाउंडेशन, ५/२०७,साने गुरूजी नगर, सदाशिव पेठ, पुणे–४११०३० या संस्थेमार्फत पुणे मनपाकडे करार संपेपर्यत वार्षिक अहवाल प्रत्येक वर्षी समाज विकास विभागाकडे सादर करणेस.

**८)** सदर प्रकल्प राबविताना काही अनुचित प्रकार, घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी द हिंदू फाउंडेशन, ५/२०७,साने गुरूजी नगर, सदाशिव पेठ, पुणे–४११०३० या संस्थेची राहणेस.

**९)** द हिंदू फाउंडेशन, ५/२०७,साने गुरूजी नगर, सदाशिव पेठ, पुणे–४११०३० या संस्थेने व्यवस्थित व समाधानकारक काम केले नाही तर संस्थेकडील जागा काढून घेणेस.

**विषय क्र.७/७३**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/माव्य/१७४,दि.११/६/२०२६ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५९,दि.१२/६/२०२६

३) मा.विशाल धनवडे व मा.रूपाली धाडवे यांचे दि.१६/६/२०२६ रोजीचे फेरविचाराचे पत्र.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.३००,दि.१६/६/२०२६

-----

मा.स्थायी समिती ठराव क्र.२५९,दि.१२/६/२०२६ चा खालीलप्रमाणे फेरविचार करण्यात यावा.

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७७ अन्वये पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने विठोबा मंदिर परिसरातील भवानी पेठ सि.स.नं.१२२१, १२२२ व १२२४ येथील खाजगी मिळकती तडजोडीने ताब्यात घेण्यास, संबंधित मिळकतधारकांना नियमानुसार अनुज्ञेय मोबदला अदा करण्यास तसेच त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यासाठी खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) संदर्भ क्र.१ अन्वये मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रात नमूद केल्यानुसार प्रस्तुत प्रकरणी प्रचलित कायदेशीर तरतुदीनुसार सि.स.नं.१२२४ या संपूर्ण मिळकतीचे सोलेशियमसह देय होणारा मोबदला र.रू.२,८७,०६,२३४/- इतका परिगणित केला असून,मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे विषयपत्रात मिळकत धारक निहाय व मजलानिहाय मोबदला रक्कम विगतवारी तक्ता क्रमांक क मध्ये नमूद करण्यात आला असून त्यानुसार त्यांचे विषयपत्रात नमूद मिळकत धारकांनी तोंडी अंदाजित मागणी केलेली र.रू.४,२०,००,०००/- आदा करणेस मा.स्थायी समितीने शिफारस केलेली आहे. तथापि दि.१२/६/२०२६ रोजी मिळकतधारक क्र.१ व २ यांनी लेखी मागणीद्वारे प्रत्येकी र.रू.७५ लक्ष इतकी नुकसान भरपाई रक्कम मिळणेची मागणी केली आहे. संबंधितांनी लेखी मागणी केल्याप्रमाणे पूर्वीच्या र.रू.१,४०,००,०००/- एकत्रित रकमेऐवजी या मिळकतधारकांना प्रत्येकी ७५ लक्ष प्रमाणे एकूण र.रू.१,५०,००,०००/- मोबदला आदा करणेत यावा. अशा प्रकारे सि.स.नं.१२२४ मधील संबंधित सर्व मिळकतधारकांना र.रू.४,३०,००,०००/- रक्कम मा.महासभेच्या मान्यतेच्या अधीन राहून एक वेळची अपवादात्मक बाब म्हणून मनपा अधिनियमांमधील कलम ७७ अन्वये मा.स्थायी समिती स्तरावर जाणीवपूर्वक निर्णय घेऊन त्वरित अदा करून ताबा घेण्यात यावा.

२) सदर प्रकरणी मिळणाऱ्या मुख्य मोबदल्याव्यतिरिक्त खालील सर्व खर्च पुणे मनपाकडून स्वतंत्रपणे अदा करण्यात येतील. स्टॅम्प डयुटी आणि रजिस्ट्रेशन फी, दस्त तपासणी व जाहिरात नोटीस फी,१% टीडीएस (TDS) आणि इतर उर्वरित आयकर प्रशासकीय कामांसाठी विविध विभागांकडे भरावे लागणारे इतर सर्व तदनुषंगिक शुल्क.

३) सि.स.नं.१२२४ मिळकतीमधील तळ व स्टील्ट मजला ताब्यात न घेता वरील तीन निवासी मजले ताब्यात घेणे संयुक्तिक ठरणार नव्हते तथापि, सदर मिळकतीमधील सर्व मिळकतधारक जागा ताब्यात देण्यास तयार असल्याने सर्व बाधित मिळकत धारकांना एकत्रित मोबदला आदा करणेत यावा.

४) पुणे शहरामध्ये पालखीचे आगमन ९ जुलै २०२६ ला होणार असल्याने तत्पूर्वी जागा ताब्यात घेऊन समतल करणे आवश्यक असल्याने वेळेची निकड विचारात घेऊन तसेच मिळकतधारक वर नमूद मोबदल्यांचे धनादेश प्राथमिक ताबेयादी करतानाच आदा करावा व तदनंतर पुढील कार्यवाही करावी. कारण प्रचलित कार्यपध्दतीनुसार निर्वेध मालकी हक्क, कोणत्याही प्रकारचा बोजा, त्रयस्थ पक्षाचे हितसंबंध, न्यायालयीन वाद त्याप्रमाणे इतर विभागांचे अभिप्राय इ.बाबत कार्यवाहीसाठी लागणारा वेळ जास्त असून पालखी सोहळा केवळ पंधरा दिवसांवर येत असून, प्रचलित कार्यपध्दती नुसार कार्यवाही केल्यास सार्वजनिक सुरक्षिततेचा हेतू साध्य होणार नाही. त्यामुळे त्वरित प्राथमिक ताबेयादीने मोबदला आदा करून जागा ताब्यात घेऊन इमारत पाडून सपाटीकरण करावे. त्याचप्रमाणे संबंधित मिळकतधारकांकडून विहित नमुन्यातील हमीपत्र सादर करून घेण्यात यावे.

मा.स्थायी समिती ठराव क्र.२५९,दि.१२/६/२०२६ चा निरस्त करण्यात येत आहे.

( मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावावर कार्यवाही करावी. )

<u>विषय क्र.८/७४</u>

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्राथमिक/१२७,दि.२५/५/२०२६ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२६,दि.११/६/२०२६

३) मा.रूपाली धाडवे व मा.मयुरी कोकाटे यांचे दि.१६/६/२०२६ रोजीचे फेरविचाराचे पत्र.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.३०१,दि.१६/६/२०२६

-----

मा.स्थायी समिती ठराव क्र.२२६,दि.११/६/२०२६ चा खालीलप्रमाणे फेरविचार करण्यात यावा.

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्राथमिक/१२७,दि.२५/५/२०२६ चे विषयपत्रात नमूद केल्यानुसार निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने सदर संस्थेसोबत ९ वर्षे कालावधीसाठी करारनामा न करता ०३ वर्षे

कालावधीसाठी करण्यात यावा.

२) याच धर्तीवर अन्य सामाजिक , शैक्षणिक संस्थाकडून पुणे महानगरपालिकेच्या शाळा चालविण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झाल्यास तात्काळ निविदा प्रक्रिया राबवून कार्यवाही करणेत यावी.

३) पुणे महानगरपालिकेच्या शाळांचा व त्यामधील शिक्षणाचा दर्जा उंचावणेकरिता कार्यवाही करण्यासाठी मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची स्थापना करण्यात यावी. अभ्यास गटामध्ये किती व कोणते सदस्य असावेत याचे अधिकार मा.महापौर यांना राहतील.

मा.स्थायी समिती ठराव क्र.२२६,दि.११/६/२०२६ निरस्त करण्यात येत आहे.

<u>विषय क्र.९/७५</u>

संदर्भ – १) मा.मंजुषा नागपुरे, महापौर व मा.सौ.जयश्री भूमकर यांचे दि.१६/६/२०२६ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३०२,दि.१६/६/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयानुसार (DP) पेठ वडगाव बुद्रुक येथील सर्वे नंबर ३१ ( इंडियन ह्युम पाईप कंपनी ) ते वडगाव बुद्रुक सर्वे नंबर ११ ( सन सिटी रोड ) मार्गे कर्वेनगर येथील नदीवरील पुलाला (Bridge) जोडणाऱ्या रस्त्याचा विकास करणे, परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्याच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. तसेच वडगाव बुद्रुक सर्वे नंबर ३१( इंडियन ह्युम पाईप कंपनी ) ते सर्वे नंबर २३ आणि २४ ( प्रयेजा सिटी ) कडे जाणारा ३० मीटर रूंदीचा रस्ता विकसित करणे तितकेच आवश्यक आहे. या भागातील वेगाने वाढते नागरीकरण लक्षात घेता, तसेच सनसिटी ते कर्वेनगर दरम्यान नव्याने बांधण्यात येत असलेल्या नदीवरील पुलाचा महत्तम व सुलभ वापर होण्यासाठी हा जोडरस्ता (Approach Road ) प्राधान्याने विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर रस्त्याचे काम प्रत्यक्ष जमिनीवर सुरू करण्यासाठी, रस्त्याच्या आखणीत (Alignment) बाधित होणाऱ्या मिळकतधारकांच्या जागा कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून योग्य मोबदल्यापोटी (TDR/FSI किंवा रोख परतावा ) महापालिकेच्या ताब्यात घेणे आवश्यक आहे.जेणेकरून या महत्वपूर्ण रस्त्याचे काम विनाअडथळा आणि तातडीने पूर्ण करता येईल. अशा या जनहिताच्या, महत्वपूर्ण सार्वजनिक आणि पायाभूत सुविधेच्या कामासाठी मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

<u>विषय क्र.१०/७६</u>

संदर्भ – १) मा.सुहास टिंगरे व मा.विशाल धनवडे यांचे दि.१६/६/२०२६ रोजीचे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३०८,दि.१६/६/२०२६

विषय – आळंदी रोड मार्गे पुणे शहरात प्रवेश करताना कळस परिसरात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीच्या प्रारंभस्थळी महाराष्ट्राचे आराध्य दैवत संत ज्ञानेश्वर महाराज यांचे भव्य शिल्प असलेली स्वागत कमान उभारणेबाबत.

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे हे महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जाते. आळंदी रोड हा पुणे शहरात प्रवेश करण्याचा अत्यंत महत्वाचा मार्ग असून दररोज हजारो नागरिक, वारकरी, भाविक, पर्यटक तसेच देश-विदेशातील पाहुणे या मार्गाचा वापर करतात.कळस परिसरात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीची सुरूवात होत असल्याने या ठिकाणी शहराच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वैभवाचे प्रतीक म्हणून भव्य स्वागत कमान उभारणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील अजरामर संत, ज्ञानेश्वरी या महान ग्रंथाचे निर्माते व अखंड महाराष्ट्राचे श्रध्दास्थान असलेले संत ज्ञानेश्वर महाराज यांचे कार्य संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी आहे. आळंदी हे त्यांचे संजीवन समाधीस्थळ असल्यामुळे आळंदी मार्गावरील पुणे प्रवेशद्वारावर त्यांचे शिल्प असलेली कमान उभारणे हे सांस्कृतिक दृष्टया अत्यंत उचित व गौरवास्पद ठरेल. त्यामुळे पुणे महानगरपालिकेने आळंदी रोडवरील कळस परिसरात, पुणे शहराच्या हद्दीच्या प्रारंभस्थळी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पूर्णाकृती शिल्पासह भव्य स्वागत कमान उभारणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.११/७७**

संदर्भ – १) मा.डॉ.दादा कोंद्रे व मा.वृषाली कामठे यांचे दि.१६/६/२०२६ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३१२,दि.१६/६/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिका क्षेत्रात खाजगी रूग्णालये, नर्सिंग होम्स व लहान-मध्यम आरोग्य संस्था २४ X ७ अविरत रूग्णसेवा देत असून, पुण्याच्या एकूण सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा ७०% पेक्षा जास्त भार खाजगी वैद्यकीय क्षेत्रावर आहे. परंतु सद्यस्थितीत लागू असलेल्या क्लिष्ट प्रशासकीय प्रक्रियेमुळे या संस्थांना दरवर्षी नूतनीकरण, विविध परवानग्या आणि नाहरकत प्रमाणपत्रे (NOC) मिळवण्यासाठी प्रचंड आर्थिक, प्रशासकीय व मनुष्यबळ खर्च करावा लागत आहे. यामुळे डॉक्टरांचा अमूल्य वेळ प्रशासकीय चक्रात जात असून, प्रत्यक्ष रूग्णसेवेवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. Fire Noc, BMW Authorization, MPCB Consent, Property Tax व Water NOC यासाठी एकच कागदपत्र ५ ते ६ वेगवेगळ्या विभागांना वारंवार सादर करावी लागतात. वेगवेगळ्या परवान्यांचा कालावधी विसंगत आहे. ( उदा. फायर NOC -१ वर्ष, बायोमेडिकल वेस्ट-१ वर्ष, नर्सिंग होम नोंदणी-३ वर्षे ) यामुळे हॉस्पीटलमध्ये वर्षभर केवळ नूतनीकरणाचेच चक्र सुरू राहते. प्रक्रिया ऑनलाईन तर काही ऑफलाईन आहेत. मंजुरीसाठी ३ ते ४ महिन्यांचा विलंब लागत असल्याने, या मधल्या काळात तांत्रिकदृष्ट्या रूग्णालय अनधिकृत ठरते. परिणामी रूग्णांचे विमा क्लेम ( Insurance Claims ) आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) पॅनलच्या मंजुरीमध्ये मोठ्या अडचणी येतात. १० ते २० बेडच्या लहान हॉस्पीटल्सना आणि १०० बेडच्या कॉर्पोरेट हॉस्पिटल्सना एकसारखेच नियम व खर्च असल्याने लहान हॉस्पीटल्स बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. आरोग्य क्षेत्रातील Ease of Doing Business मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या MAITRI पोर्टलच्या धर्तीवर मनपा आरोग्य विभागाच्या अंतर्गत एकच मध्यवर्ती पोर्टल सुरू करावे. सर्व प्रकारच्या NOC, परवाने एकच कॉमन अर्ज, एकच पेमेंट गेटवे आणि एकच ट्रॅकिंग ID या पोर्टलवर उपलब्ध असावा. गोवा व कर्नाटक राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ अंतर्गत नोंदणी/नूतनीकरणाची वैधता ३ वर्षावरून ५ वर्षे करण्यात यावी. इमारतीत कोणताही संरचनात्मक (STRUCTURAL) बदल नसल्यास आणि वार्षिक फायर ऑडिट रिपोर्ट ऑनलाईन सादर करण्याच्या अटीवर, फायर NOC ची वैधता ५ वर्षासाठी करण्यात यावी. दरवर्षी केवळ ऑनलाईन Self-Certification (स्वयं-प्रमाणपत्र ) घ्यावे. रूग्णालयांकडून दरवर्षी सर्व नियम पाळत असल्याचे स्वयंघोषणापत्र ऑनलाईन घ्यावे. मनपाने केवळ २०% रूग्णालयांची Random/Risk Based तपासणी करावी किंवा तक्रार असलेल्या रूग्णालयांचीच चौकशी करावी. प्रॉपर्टी टॅक्स, वॉटर टॅक्स आणि ट्रेड लायसन्सची माहिती मनपाच्या सर्व्हरवर आधीच उपलब्ध आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने इतर विभागांकडून NOC मागण्याऐवजी API द्वारे थेट डेटा पडताळणी करावी. हॉस्पीटल्सना स्वतंत्र NOC आणण्याची रद्द करावी. केंद्र शासनाच्या धोरणानुसार Biomedical Waste Authorization व MPCB Consent ची वैधता किमान ३ ते ५ वर्षे करण्यात यावी. कागदपत्रे पूर्ण असलेला अर्ज सादर केल्यापासून ३० दिवसांच्या आत संबंधित विभागाने निर्णय न घेतल्यास, सदर परवाना/नूतनीकरण Deemed Approved ( गृहीत मंजूर ) समजण्यात यावे. PMC अंतर्गत नोंदणीकृत सर्व खाजगी हॉस्पीटल्सना MJPJAY, PMJAY आणि मनपाच्या नागरी आरोग्य योजनांसाठी ऑटोमॅटिक व कंपल्सरी पात्रता द्यावी.

यामुळे ससून व इतर शासकीय रूग्णालयांवरील ४०% ताण कमी होईल व नागरिकांना तात्काळ कॅशलेस उपचार मिळेल.वार्षिक प्रशासकीय व कायदेशीर खर्च ६०% कमी होईल आणि डॉक्टरांचा वेळ रूग्णसेवेसाठी वापरात येईल.पाच वेगवेगळ्या विभागांचे मनुष्यबळ वाचेल, पारदर्शकता वाढेल, भ्रष्टाचाराच्या तक्रारी नाहीशा होतील आणि संपूर्ण शहरातील आरोग्य क्षेत्राचा डेटा एकाच डॅशबोर्डवर उपलब्ध होईल. शासकीय योजनांचे नेटवर्क वाढल्यामुळे गरिबांना आणि मध्यवर्गीयांना जवळच्या खाजगी रूग्णालयांमध्ये मोफत/कॅशलेस उपचार मिळणे सुलभ होईल. पुणे शहर देशात मेडिकल हब म्हणून नावा-रूपास येईल.पुणे महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना जलद, सुलभ आणि किफायतशीर आरोग्य सेवा मिळण्याच्या दृष्टीने तसेच खाजगी रूग्णालये व नर्सिंग होम्सच्या प्रशासकीय अडचणी दूर करून आरोग्य क्षेत्रात Ease of Doing Business धोरण प्रभावीपणे राबवण्यासाठी PMC Health-Ease Single Window Clearance ( एक खिडकी )ऑनलाईन प्रणाली तात्काळ विकसित करून लागू करण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.१२/७८**

संदर्भ – १) समाज विकास विभाग आ.क्र.८२५,दि.६/५/२०२६ रोजीचे पत्र.

२) महाराष्ट्र महानगरपालिका ( स्थावर मालमत्तेचे भाडेपट्टयाद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्टयाचे नूतनीकरण ) नियम २०२३

३) मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालय, जा.क्र.माव्य/७९१,दि.५/५/२०२६
४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, दि.८/१०/२०२४
५) ग्रॅव्हीटी फाउंडेशन यांचे दि.२५/५/२०२६ रोजीचे पत्र.
६) कार्यकारी अभियंता कार्यालय, बांधकाम विकास विभाग, झोन क्र.६ यांचे जावक क्र.झोन क्र.६/१७४८,दि.८/६/२०२६ रोजीचे पत्र.
७) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि/१८७,दि.१६/६/२०२६ चे पत्र.
८) मा.स्थायी समिती ठराव क्र.३१६,दि.१६/६/२०२६

-----

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

ज्येष्ठ नागरिकांच्या वृध्दाश्रमासाठी ग्रॅव्हीटी वेल्फेअर फाऊंडेशन यांना पुणे मनपाची ( ॲमेनिटी स्पेस ) मोकळी जागा दीर्घकालीन वापरासाठी मिळणेबाबतच्या खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) ग्रॅव्हीटी वेल्फेअर फाऊंडेशनच्या मागणीप्रमाणे ॲमेनिटी स्पेसची मोकळी जागा ( कोथरूड सि.स.नं.६७०, स.नं.१२/२, १२/५ येथील भूखंडावर घर ( ओ.ए.एच-३) पैकी क्षेत्रफळ ३६११.३६ चौ.मी.) स्थावर मालमत्तेचे भाडेपट्टयाद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्टयाचे नुतनीकरण नियम, २०२३ मधील मुद्दा क्र.४ नुसार कार्यवाही करणेस.

२) भाडे आणि सुरक्षा ठेव समिती मार्फत जे भाडे निश्चित केले जाईल त्यानुसार सदर संस्थेस जागा भाडेतत्वावर देणेस तसेच महाराष्ट्र महानगरपालिका नियम २०२३ चे अनुषंगाने भाडे पट्टयाच्या रक्कमेत दर तीन वर्षांनी सुधारणा करून वर्तमान वार्षिक भाडेपटयाची रक्कम पाच टक्क्यांनी वाढविणेस व त्या प्रमाणात सुरक्षा अनामत रक्कमेत वाढ करणेस.

३) सदर ठिकाणी प्रकाश व्यवस्था, पाण्याची व्यवस्था करणे, सदर मिळकतीची संपूर्ण देखभाल तसेच किरकोळ देखभाल दुरूस्ती करणे तसेच विविध सोयी व कोणत्याही प्रकारची देयक जसे की विज देयक अथवा इतर तत्सम देयक ग्रॅव्हीटी वेल्फेअर फाऊंडेशन कडून करणेस.

४) प्रकल्पासाठी आवश्यक असलेले फर्निचर व्यवस्था, तद्नुषंगिक साधन-सामुग्री, आवश्यक मनुष्यबळ, वैद्यकीय सेवा इत्यादी बाबी ग्रॅव्हीटी वेल्फेअर फाऊंडेशनमार्फत पुरविणेस.

५) ग्रॅव्हीटी वेल्फेअर फाऊंडेशन यांच्या मार्फत पुणे मनपाकडे करार संपेपर्यत वार्षिक अहवाल प्रत्येक वर्षी समाज विकास विभागाकडे सादर करणेस.

६) सदर प्रकल्प राबविताना काही अनुचित प्रकार, घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ग्रॅव्हीटी वेल्फेअर फाऊंडेशनची राहणेस.

७) भवन रचना विभाग व बांधकाम विकास विभाग यांच्या अटी व नियमानुसार वृध्दाश्रमाचे बांधकाम संस्थेमार्फत करणेस.

८) सदर संयुक्त प्रकल्पांतर्गत संस्थेद्वारे उभारण्याच्या व्यवस्थेमध्ये क्षमतेच्या २५ टक्के पर्यंतच्या जागांसाठी मा.महापालिका आयुक्त शिफारस करतील त्या ज्येष्ठ नागरिकांस विनामुल्य राहण्यास जागा देणे बंधनकारक राहील.

९)सदर संयुक्त प्रकल्पांतर्गत संस्थेद्वारे उभारण्याच्या व्यवस्थेमध्ये क्षमतेच्या उर्वरित ७५ टक्के जागांसाठी माफक दराने शुल्क आकारणी करणे बंधनकारक राहील.

१०) ३० वर्षांसाठी करारनामा करून जागा उपलब्ध करून देणेस व तदनंतर इमारत मालकी पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेस आवश्यक राहील.

**<u>विषय क्र.१३/७९</u>**

संदर्भ - १) मा.हरिदास चरवड यांचे दि.५/६/२०२६ चे पत्र.
२) मा.विधी समिती ठराव क्र.५,दि.१०/६/२०२६

----

मा.विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना टीडीआर, एफ.एस.आय व रोख स्वरूपात मोबदला आदा करण्यात येतो. तरी पुणे महानगरपालिकेकडून विविध प्रकरणी आदा करण्यात येणाऱ्या टीडीआर, एफ.एस.आय व रोख स्वरूपात मोबदला याची एकवट माहिती मा.विधी समितीकडे दरमहा अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.१४/८०**

संदर्भ – १) मा.सिध्दी शिळीमकर व मा.सौ.अर्चना जगताप यांचे दि.१०/६/२०२६ चे पत्र.

२) मा.विधी समिती ठराव क्र.६,दि.१०/६/२०२६

----

मा.विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे मनपातील विधी विभागामार्फत विविध न्यायालयांमध्ये पुणे मनपातर्फे केसेस चालविल्या जातात. सदर केसेस कामी पॅनलवरील व इतर वकील यांना फी, मानधन अदा केले जाते. तसेच वेगवेगळ्या कायदेशीर अभिप्रायांकरिता देखील फी, मानधन इ.अदा केले जाते. अशा प्रकारे विविध कामांकरिता विधी विभागामार्फत अदा केल्या जाणाऱ्या फी / मानधनांची माहिती विधी समितीस असणे आवश्यक आहे. तरी पुणे मनपाचे विधी विभागास दरमहा सादर होणाऱ्या तसेच अदा केल्या जाणाऱ्या मानधनांची माहिती विधी समितीसमोर प्रत्येक महिन्याच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.१५/८१**

पुणे महानगरपालिका हद्दीमधील मंगळवार पेठ येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक असून त्या शेजारील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या मालकीचे मंगळवार पेठ न.भु.क्र.४०५ मधील ८९०० चौ.मी.क्षेत्र या जागेबाबत मा.परशुराम वाडेकर, उपमहापौर व मा.सनी निम्हण यांचे दि. ६/४/२६ च्या पत्रावर पक्षनेते समितीत दि.५/५/२०२६ रोजी झालेल्या निर्णायस अनुसरून मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/१७२, दिनांक १०/६/२०२६ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्र.१६/८२**

संदर्भ – १) महाराष्ट्र शासनाकडील अधिसूचनी क्र.पीएमसी-२०२०/प्र.क्र.३२२/नवी-२,दि.३०/६/२०२१

२) महाराष्ट्र शासनाकडील अधिसूचनी क्र.पीएमसी-१८२१/११६७/प्र.क्र.९८/२०२१/नवी-१३ दि.११/२/२०२६

३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शआ/१५५,दि.४/६/२०२६ चे पत्र.

४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.७२,दि.१६/६/२०२६

------

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या विषयपत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

पुणे महानगरपालिका हद्दीत दि.३०/६/२०२१ रोजी समाविष्ट २३ गावांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१ अन्वये नियोजन प्राधिकरणाकडून प्रारूप विकास आराखडा तयार करणेसाठीची प्रक्रिया सुरू करणे या अनुषंगाने कलम २३(१) अन्वये विकास आराखडा तयार करण्याचा इरादा जाहीर करणेकरीता तसेच कलम २४ अन्वये नगररचना अधिकाऱ्याची नियुक्ती करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१ नुसार दि.३०/६/२०२१ रोजी समाविष्ट २३ गावांच्या प्रारूप विकास आराखडयाची प्रक्रिया सुरू करणेस.

२) पुणे महानगरपालिका हद्दीत दि.३०/६/२०२१ रोजी समाविष्ट २३ गावांसाठी उपरोक्त अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये शासकीय राजपत्रात इरादा जाहीर करणेस.

३) सदर विकास आराखडा तयार करण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडील नगररचना शास्त्रातील पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेले श्री.अनिरूध्द पावसकर ( एम.ई.टाऊन प्लॅनिंग ) शहर अभियंता यांची कलम २४ अन्वये नगररचना अधिकारी म्हणून नियुक्ती करणेस.

**योगिता भोसले ,**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.